# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे सराव चाचणी परीक्षेचे आयोजन
# सप्टेंबर २०१८ ते डिसेम्बर २०१८

प्रस्तावना :- स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारा संचालित महिला महाविद्यालय येथे दिनांक २४ ऑगस्ट २०१८ रोजी एक दिवसीय स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे उदघाटक अमरावतीच्या पोलीस उपायुक्त मा.निवा जैन यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्ष :- प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील
उदघाटक :- मा. मा. निवा जैन(पोलीस उपायुक्त ,झोन क्र.१-अमरावती)
प्रमुख अतिथी :- मा.प्रा.अंबादास मोहिते
(विभागीय संचालक , यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,अमरावती)
प्रमुख मार्गदर्शक :- मा.प्रियंका कोटावर कोटावार
(पोलीस निरीक्षक,राज्य गुन्हे अन्वेषण,अमरावती)
आयोजक :- स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र
वाणिज्य शाखा
इतिहास विभाग
अर्थशास्त्र विभाग
लाभार्थी :-बी.ए व बी.कॉम च्या विद्यार्थिनी
उद्देश :- स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करून घेणे.

## अहवाल

दिनांक २४ ऑगस्ट २०१८ रोजी एक दिवसीय स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे उदघाटक अमरावतीच्या पोलीस उपायुक्त मा.निवा जैन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील सर तर प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे विभागीय संचालक प्रा.अंबादास मोहिते सर उपस्थित होते.

विद्यार्थिनींना अमरावतीच्या पोलीस उपायुक्त मा. निवा जैन यांनी लोकसेवा आयोग परीक्षेच्या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेत सर्वात आधी स्वतःचे ध्येय निश्चित करून अभ्यासक्रमाची माहिती घ्या , योग्य क्लासेसची निवड, मागील १० वर्षाच्या आयोगाच्या झालेल्या पेपरचे मूल्यमापन करून नियोजनात्मक तयारी करा सकारात्मक राहुन शरीर निरोगी ठेवा असे सांगितले. डॉ. अंबादास मोहिते सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात वर्तमानात जागा , स्वतःची ओळख करून घ्या. परिस्थितीवर मात करून मनापासून प्रयत्न

करा या संदर्भात यशाची सप्तसुत्री उदाहरणाच्या आधारे समजावून सांगितली.स्पर्धा परीक्षेची विस्तृत तयारी, पात्रता,परीक्षेचे स्वरूप ,परीक्षेची तयारी कशी करावी , का करावी , केव्हा करावी, नेमके काय वाचावे,पेपर कसा सोडवावा असे मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्रात अमरावतीच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस निरीक्षक मा. प्रियंका कोटावार मॅडम यांनी विद्यार्थिनींही प्रतिकुल परिस्थितीतही ध्येयापर्यंत पोहचू शकते मात्र यासाठी प्रचंड आत्मविश्वासह कौशल्यपूर्ण नियोजन हवे असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी पोलीस उपायुक्त मा. निवा जैन पोलीस अधीक्षक असतांना जम्मू-काश्मीर येथील कठुवा येथे कर्तव्य बजावत असतांना त्यांच्या नेतृत्वात दोन दहशतवादांचा खात्मा केला. याबद्दल केंद्र शासनाने त्यांना राज्यपालाच्या हस्ते शौर्य पुरस्कार जाहीर केला आहे.त्यांच्या धाडसांचे उदाहरण प्राचार्यांनी विद्यार्थिनींसमोर ठेऊन त्यांच्यासारखे धाडसी बना असा मोलाचा संदेश दिला. तसेच अतिथीचे अभिनंदन व आभार मानले.

सदर कार्यशाळेचे संचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.मंजुषा धापूडकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत व सत्कार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयक प्रा.डॉ.शालिनी पांडे यांनी केले.

कार्यशाळेचे आयोजन प्रा.डॉ.शालिनी पांडे ,प्रा.डॉ.मंजुषा धापूडकर, प्रा.जयश्री पोकळे , प्रा.डॉ.ज्योती ढोमणे , प्रा.डॉ.प्रीती नाईक , ध्येय अकॅडमीचे संचालक श्री.सूचित कुंभारकर व विद्यार्थिनींनी केले.

फलनिष्पत्ती :- विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी हे ज्ञात झाले.





**स्पर्धा परीक्षा क्षमता चाचणीचे संचलन करतांना ध्येय अकॅडमीचे संचालक श्री.सुचित कुंभारकर**





**स्पर्धा परीक्षा क्षमता चाचणीला उपस्थित विद्यार्थिनी**